NAVJYOT /Vol. XI / Issue – IV ISSN 2277-8063

# कोल्हापूर जिल्हयामधील छत्रपती शाहू महाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान

**कु. सुमन प्रभाकर कांबळे.** संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**गोषवारा**

भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. कोल्हापूर जिल्ह्याचा कृषी संदर्भात अभ्यास केला असता असे दिसून येते की, अनेक समाजसुधारकांनी त्याविषयी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यातील एक महत्वाचे कृषी क्रांती घडवून कोल्हापूर जिल्हयाला "सुजलाम-सुफलाम" करण्याचे श्रेय व नाव म्हणजे कोल्हापूर संस्थानचे राजे छत्रपती शाहू महाराज होय. छत्रपती शाहू महाराजांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलीच याचबरोबर कृषी क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले. त्यावेळी त्यांनी औद्योगिक क्रांतीची सुरवात कृषी क्षेत्रातच्या आधारावरच केली होती

**प्रस्तावना:-**

छत्रपती शाहू महाराजांनी इ.स. १८८४ ते इ.स. १९२२ या कारकिर्दित कोल्हापूर संस्थानाचा कारभार पाहिला. ब्रिटिश राज्यसत्तेच्या काळात सामान्य जनतेला, मागास शेतकर्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक प्रगतीसाठी विशेष प्राधान्य दिले छत्रपती शाहू महाराजांनी शेतकर्यांसाठी सहकारी संस्थाची स्थापना करून शेतकर्यांना कर्जे उपलब्ध करून दिलीत. शेतीक्षेत्रात विविध नवनवीन प्रयोग करून शेतीक्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला उत्तेजन दिले.

नगदी पिकांसाठी व तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी किंग एडवर्ड अॅग्रीकल्चर इस्टस्टूट ची स्थापना केली. दुष्काळावर मात करण्यासाठी दुरदृष्टीकोनातून जलव्यवस्थापन केले. छत्रपती शाहू महाराजांचे विविध क्षेत्रातील योगदान व उल्लेखनीय कामगिरीमुळे कानपुरच्या कुर्नी समाजाने 'राजर्षी' ही पदवी त्यांना बहाल केली.

**संशोधनाची उद्दिष्टये:-**

1. कोल्हापूर जिल्हयातील छत्रपती शाहू महाराजांनी दिलेले कृषी क्षेत्रातील योगदान.
2. कोल्हापूर जिल्हयामधील छत्रपती शाहू महाराजांनी केलेले जलव्यवस्थापन.
3. कोल्हापूर संस्थानामध्ये कृषी क्षेत्राच्या विकासासाठी छत्रपती शाहू महाराजांनी राबवलेल्या योजना व प्रकल्प.

**संशोधन पद्धती:-**

पुस्तके, अहवाल, व्याख्याने, आरबीआय अहवाल, इंटरनेट इत्यादीच्या मार्फत दुय्यम माहिती जमा केली आहे.

**संशोधनाची मर्यादा:-**

या संशोधनाची मोठी मर्यादा म्हणजे सध्याचे संशोधन हे कोल्हापूर जिल्हयातील कृषी क्षेत्राशी संबंधित आहे. या संशोधनाचा निष्कर्ष इतर क्षेत्रासाठी लागू होणार नाही.

**माहिती विश्लेषण:-**

**अ)कोल्हापूर जिल्हयामधील छत्रपती शाहू महाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान.**

**अ)कोल्हापूर संस्थानामधील दुष्काळ व छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या उपाययोजना:-**

१८८६ पासून ते १८९९ या चार वर्षांत महाराष्ट्रात व पर्यायाने कोल्हापूर संस्थानामध्ये दुष्काळ निर्माण झाला. या दुष्काळात जनावरांवर, रयतेवर, कृषी क्षेत्रावर झालेला परिणाम व त्यांची बिकट अवस्था पाहून छत्रपती शाहू महाराजांच्या मनावर मोठा आघात झाला. यावर उपाययोजना म्हणून कोल्हापूर संस्थानात एकही भूकबळी न जाऊ देता महाराजांनी १९०२ साली दोन जाहिरनामे काढले त्यातील पहिला जाहिरनामा आरक्षणा -विषयक होता तर, दुसरा जाहिरनामा सार्वत्रिक पाटबंधारे धोरणाचा होता. यामध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूरातील पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण करून त्यांची संख्या कशा प्रकारे वाढविता येईल याकडे लक्ष दिले. तलाव, बंधारे यामध्ये किती प्रमाणात पाणी साठा उपलब्ध होतो व त्यामधील गाळाचे प्रमाण किती आहे, या गाळाचा उपसा केल्यास किती प्रमाणात जास्त पाण्याचा साठा निर्माण होईल, कोणत्या ठिकाणी पाणी अडवता येईल, या सर्व बाबींचा सविस्तरपणे अभ्यास करून माहिती घेतली. महाराष्ट्र सरकारने सध्या केलेल्या उपाययोजनांची अमंलबजावणी १०० वर्षापूर्वीच छत्रपती शाहू महाराजांनी केलेली होती. त्यांनी दुष्काळासारख्या परिस्थितीवर मात करण्यासाठी धरणे बांधली, विहिरी खोदल्या, विविध ठिकाणी जलसिंचनाची योजना राबवली.

कोल्हापूर संस्थानामध्ये महाराजांनी 'स्वतंत्र पाटबंधारे' खात्याची निर्मिती करून नियोजन व्यवस्था निर्माण केली.

या नियंत्रण यंत्रणा अस्तित्वात आणून त्याकरिता अनेक तज्ञ अधिकाऱ्यांची नेमणूक केली. पाटबंधारे खात्यामार्फत कोल्हापूर संस्थानातील गावांचे निरिक्षण करण्यात आले. व विविध उपाययोजनांची प्रत्यक्षरित्या कार्यवाही करण्यात आली.

**ब) कृषी क्षेत्राच्या विकासासाठी व दुष्काळावर उपाययोजना म्हणून उभारण्यात आलेला भव्य राधानगरी धरण प्रकल्प:-**

कोल्हापूर संस्थानामध्ये नव्याने २० बंधारे उभारण्यात आले तरीही छत्रपती शाहू महाराजांची महत्त्वकांक्षा अद्यापही पूर्णत्वास गेली नाही, म्हणूनच त्यांनी राधानगरी धरणासारखे विस्तारित स्वप्न पाहिले.

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील पर्जन्यमानाचे निरिक्षण केले असता अशी परिस्थिती दिसून आली की, या भागात पुरेश्या प्रमाणात पर्जन्यमान होते. नद्या काठोकाठ भरतात मात्र पावसाळी ऋतू संपल्यानंतर कोल्हापूर संस्थान कोरडे होते, याचा परिणाम कृषी क्षेत्रावर ही मोठया प्रमाणात होती. छत्रपती शाहू महाराजांनी याबाबतीत सखोल विचारमंथन करून भोगावती नदीचा जलप्रवाह अडविणाऱ्या 'राधानगरी' धरणाची महत्वाकांक्षी योजना उदयास आणली. राधानगरी धरणामुळे शेती क्षेत्राचा कायापालट झाला

१९०९ साली सुरू झालेली ही योजना १९१८ साली पूर्णत्वास आली, या योजनेसाठी १४ लाख रुपये इतका खर्च करण्यात आला होता. "हा प्रकल्प सिद्धीस, पूर्णत्वास गेल्यावर माझे जिवीत कार्य पूर्ण होईल" असे उदगार छत्रपती शाहू महाराजांनी एका पत्रात काढले होते. आजही कोल्हापूर भागाला 'सुजलाम-सुफलाम' करण्यात या प्रकल्पाचा मोठा वाटा आहे.

**क)छत्रपती शाहू महाराजांनी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राबविलेल्या उपाययोजना व प्रकल्प:-**

हरितक्रांतीचे जनक म्हटल की आपल्याला डॉ. स्वामीनाथन हे नाव आठवते पण यांच्या सारखीच कृषी क्षेत्रामध्ये खूप पूर्वीच छत्रपती शाहू महाराजांनी उल्लेखनीय कार्य केल्याचे दिसून येते. कारण मुख्यतः जास्त प्रमाणात त्याकाळी लोकसंख्या शेतीमध्ये कार्य करीत होती. कोल्हापूर जिल्हयाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रथम शेती क्षेत्राचा विकास केला पाहिजे ही दूरदृष्टी छत्रपती शाहूमहाराजांकडे सव्वाशे वर्षापूर्वीच होती. म्हणूनच त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये त्यामधील रयतेमध्ये भौतिक क्रांती घडविण्यासाठी कृषी क्षेत्रात मोलाची कामगिरी केली.

**छत्रपती शाहू महाराजांची प्रयोगशील दृष्टी व चिकित्सक अभ्यास:-**

कोल्हापूर संस्थानामध्ये विविध मसाले, कडधान्ये या पारंपारिक धान्यांबरोबरच नवीन पिकांच्या उत्पादनाचे नवनवीन प्रयोग महाराजांनी सह्याद्रीच्या उताऱ्यावर केले. केरळमधील पर्जन्यमान व कोल्हापुर संस्थानाच्या पश्चिम भागातील सहयाद्री उतारावर ही तेवढेच पर्जन्यमानाचे प्रमाण असल्याने छत्रपती शाहू महाराजांनी तेथे चहाच्या मळयांचे प्रयोग केले, याचबरोबर तेथे रबरची झाडांची लागवड केली. केरळ सारख्या चहाचे उत्पादन करण्यात प्रयोग यशस्वी झाला व कोल्हापूर संस्थानामधील चहाच्या मळयापासूनचे मिळणारे उत्पादन 'पन्हाळा टी नंबर फोर' वापरात आले. छत्रपती शाहू महाराजांचे कार्य क्रांतीकारी आहे. नवनवीन वाटा शोधून, संशोधनातून त्यांनी कृषीक्षेत्रात नवा इतिहास रचला.

**ड)शेतकयांसाठी विविध प्रदर्शनांचे आयोजन:-**

शेतीव्यवसायाला आवश्यक जोडधंदा व जोडधंदयाला पूरक असा उदयोग असावा, या दृष्टीने महाराजांनी शेती, जोडधंदा व उद्योग अशी विकासाची त्रिसूत्री निर्माण केली आणि त्यानुसार त्याचे नियोजन केले. आधुनिक अवजारांची, शेती तंत्रज्ञानाची ओळख शेतकऱ्यांना होण्यासाठी शेतकरी बांधवांसाठी विविध प्रदर्शने भरविली जात होती. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये यात्रेच्या काळात ही प्रदर्शने भरविली होती कारण यामागील प्रमुख हेतू असा की, जास्त प्रमाणात लोकांपर्यंत प्रदर्शनाचा लाभ व्हावा, शेतकर्यांच्या प्रगतीसाठी आधुनिकीकरणाचा अवलंब शेती क्षेत्रात करून कृषी क्षेत्राचा विकास व्हावा.

शेतकऱ्यांचे मागासलेपण, जमिनीचे तुकडीकरण, शेती विषयक समस्या इत्यादीविषयीचे विचार छत्रपती शाहू महाराजांनी 'चेंबर ऑफ प्रिन्सेस' च्या व्यासपीठावर मांडून शेतीविषयक समस्येवरील उपाययोजनांची अभ्यासपूर्ण मांडणी केली.महात्मा फुलेंची विचारसरणी छत्रपती शाहू महाराजांनी आत्मसात करून कोल्हापूर जिल्हयामधील कृषी क्षेत्रात मोलाची कामगिरी करून कृषी क्रांती घडवून आणली.

**संदर्भ:**

1. भगत आर. टी. (२०१३), राजश्री शाहू छत्रपती, रिया प्रकाशन, मुंबई, पृष्ठे- ३१२.
2. पवार जे. बी. (२०१८), राजश्री शाहू छत्रपतींची भाषणे, मेहता प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठे- ११६.
3. https://Youtu.be/xkhloDWFIFk